NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक १७.१०.२०२६ शनिवार

(कामगिरी)

नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक १६.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १२ केसेसमध्ये १२ ईसमावर कारवाई करून एकुण ११,२१०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०२ केसमध्ये ०३ ईसमावर कारवाई करून एकुण १२,१५०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. दिनांक १६.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १७.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०५ ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये २० केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ७० केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १३८ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २५५ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १२९ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ११० केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये २६ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १५९ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०९ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १४ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०४ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,०४५ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ३१ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २१ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,१८८ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. १०,०१,७५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे लकडगंज :– शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १७.१०.२०२६ चे ०२.०० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे बिट मार्शल हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना बरबटे गार्डन जवळील गल्लीत एक ईसम संशयीतरित्या दिसुन आल्याने, त्याचेकडे जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव गजेंद्र रामेश्वर डेहरीया, वय २० वर्षे, रा. गणेश कॉलोनी, वार्ड नं. १०, खापाभाट, जि. छिंदवाडा, मध्यप्रदेश असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक लोखंडी चाकु किंमती १००/– रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोहवा. सचिन भिमटे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. दिपक पोफळे यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे सक्करदरा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २३.०९.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे राजु बालाजी पाठक, वय ६० वर्षे, रा. प्लॉट नं. १५१, धर्ती मॉ सोसायटी, चांदमारी, वाठोडा, नागपूर हे पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत तुकडोजी पुतळा ते छोटा ताजबाग दरम्यान, वाय टु के झेरॉक्स सेंटर समोरील रोडने पायदळ जात असतांना, एका अनोळखी दुचाकी चालकाने त्याचे ताब्यातील दुचाकी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन, फिर्यादीचे वडीलांना मागुन धडक देवुन घटनास्थळावरून पळून गेला. अपघातामध्ये फिर्यादीचे वडील गंभीर जखमी झाले होते. जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक १२.१०.२०२६ चे १९.१० वा. चे सुमारास डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले होते. याप्रकरणी पोलीस ठाणे सक्करदरा येथे अकस्मात मृत्युची नोंद घेण्यात आली होती.

अकस्मात मृत्युचे चौकशीत तसेच, फिर्यादी हरीष राजु पाठक, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. १५१, धरती मॉ सोसायटी, चांदमारी, वाठोडा, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे सफौ. राजेश नासरे ९९२३४९६१०० यांनी अनोळखी दुचाकी चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१, १२५(ब) भा.न्या. सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे नविन कामठी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १५.१०.२०२६ चे १०.३० वा. ते दिनांक १६.१०.२०२६ चे ०९.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत कबिर नगर, सईद नगर मागे, रनाळा, कामठी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी मोहम्मद ईमरान खान वल्द ईरफान खान पठाण, वय २१ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नातेवाईकाचे घरी कार्यक्रमाला वनदेवी नगर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, दिवाणमध्ये ठेवलेल्या पेटीतुन रोख ९,७५,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ११,१८,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि. पोहवा. नरेश खरंगबान ८८८८८०३८५४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

वाहतुक शाखेची प्रेस नोट– १

दरवर्षी प्रमाणे यावर्षीही दिनांक २०.१०.२०२६ रोजी नागपूर शहरातील **''दिक्षाभुमी''** येथे धम्मचक्र प्रवर्तनदिनाचा ७० वा सोहळा समारोह संपन्न होणार असुन, ह्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी फार मोठया प्रमाणावर बौद्ध भाविक रेल्वे, बस तसेच, खाजगी बस, मेटॅडोर, जिप, कार वाहनाने व इतर वाहनांनी दिक्षाभुमीवर अभिवादनाकरीता येतात. त्यामूळे पोलीस ठाणे धंतोली, गणेशपेठ, सिताबर्डी हद्दीतील रस्त्यावर फार मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊन, रहदारीस अडथळा निर्माण होवून एखादे वेळी कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याकरीता, दिक्षाभुमी जवळच्या परिसरातील रस्त्यावरील वाहतुकीचे नियंत्रण करण्यासाठी व सर्वसाधारण नागरिकांची गैरसोय होऊ नये याकरीता खालील नमूद मार्गावर सर्व प्रकारच्या वाहन धारकांना आपली वाहने नेण्यास बंदी घालण्यात आली आहे. यासंबंधी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

१)	काछीपुरा चौक (कृषी महाविद्यालय वस्तीगृह) ते माताकचेरी चौका पर्यतचा दोन्ही बाजूचा मार्ग	सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद
२)	काछीपुरा चौक (कृषी महाविद्यालय वस्तीगृह) कल्पना बिल्डींग (रामदासपेठ) टी पॉईन्ट पर्यतचा दोन्ही बाजूचा मार्ग	सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद
३)	माताकचेरी चौक ते कृपलानी टर्निंग, वर्धा रोड पर्यतचा दोन्ही बाजूचा मार्ग	सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद
४)	माताकचेरी चोक ते निरी रोड "टी" पॉईन्ट पर्यतचा मार्ग	सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद **(फुड झोन मधील लहान मालवाहक वाहनांना सोडुन)**
५)	माताकचेरी चौक ते लक्ष्मीनगर चौका पर्यतचा दोन्ही बाजूचा मार्ग	सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद
६)	काछीपुरा चौक ते बजाजनगर चौका पर्यंत दोन्ही बाजूचा मार्ग	सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद **(शहर बस/राज्य परिवहन विभागाची बस सेवेकरीता राखीव)**
७)	बजाजनगर चौक ते लक्ष्मीनगर चौक कडे जाणारा मार्ग	सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद

८) **अजनी रेल्वे पुलीया ते कृपलानी चौक** पर्यतचा उजव्या बाजूचा मार्ग दिक्षाभुमी येथे येणाऱ्या भाविकांच्या वाहनांना पार्कीग करीता वापरण्यात येणार आहे.

वाहतूक वळविण्याचे मार्ग –

१) लोकमत चौकाकडून काचीपूरा चौक मार्गे बजाज नगर चौकाकडे जाणारी वाहतूक ही लोकमत चौक– पंचशील चौक– झासी राणी चौक– लायब्ररी चौक– अलंकार चौक या मार्गाने जाईल. किंवा लोकमत चौक– कल्पना बिल्डींग टी पॉईंट– लायब्ररी चौक– अलंकार चौक– शंकरनगर चौक या मार्गाने जाईल.

२) वर्धा कडून कृपलानी टर्निंग, माता कचेरी चौक मार्गे जाणारी वाहतूक ही वर्धा रोड वरून अजनी मेट्रो स्टेशन, डावे वळण घेवून आर.पी.टी.एस. मार्गे जातील. तसेच लोकमत चौकाकडून कृपलानी टर्निंग मार्गे माता कचेरी चौका मार्गे जाणारी वाहतूक वर्धा रोड वरून अजनी पूल चौक, हिन्दुस्तान कॉलोनी चौक, यु–टर्न, अजनी मेट्रो स्टेशन डावे वळन घेवून आर.पी.टी.एस. मार्गे जाईल.

३) अलंकार टॉकीज चौकाकडून काचीपूरा चौक मार्गे जाणारी वाहतूक ही नॉर्थ अंबाझरी मार्गावरून शंकरनगर चौक व युनिर्व्हसीटी लायब्ररी चौक – झासी रणी चौक या मार्गे जाईल.

४) लक्ष्मीनगर चौकाकडून माता कचेरी चौका मार्गे जाणारी वाहतूक ही आठ रस्ता चौक मार्गे जाईल.

५) निरी टी–पॉईन्ट ते माता कचेरी चौक मार्गे जाणारी वाहतूक ही आर.पी.टी.एस व अजनी चौक मार्गे जाईल.

६) बजाजनगर चौकाकडून लक्ष्मीनगर चौक मार्गे जाणारी वाहतूक व्ही.एन.आय.टी. चौक, अभ्यंकरनगर मार्गे जाईल.

७) अजनी रेल्वे पुलावरून कृपलानी चौकाकडे जाणारी वाहतुक ही डावीकडे चुनाभट्टी मार्गे पुढे जाईल.

८) दिक्षाभुमीच्या आजु–बाजुचे परिसरात राहणारे नागरीक किंवा ज्यांचे कार्यालय आहे त्यांना वाहन घेवुन जाणे आवश्यक असल्यास त्यांनी पोलीस निरीक्षक, वाहतुक परिमंडळ सोनेगाव, पो.ठाणे सोनेगाव जवळ, वर्धा रोड नागपूर शहर यांच्या कडुन पासेस प्राप्त करतील.

९) ऐनवेळी निर्माण झालेल्या परिस्थितीनुसार व आवश्यकतेनुसार कर्तव्यावरील वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांना वरील मार्ग बंद/सूरू ठेवण्याचा व योग्य मार्गाने वाहतूक वळविण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

१०) **धम्मचक्र सोहळयात दिक्षाभुमी या ठिकाणी येणाऱ्या बौद्ध भाविकांनी आपली वाहने खालील ठिकाणी पार्क करावीत.**

१) धरमपेठ सायन्स कॉलेज, **२)** राणी लक्ष्मीबाई सभागृह लक्ष्मी नगर, **३)** तारकुंडे धरमपेठ हायस्कुल मैदान **४)** धरमपेठ कॉलेज ग्राऊंड **५)** बजाजनगर वॉलीबॉल मैदान, **६)** मॉर्डन हायस्कुल निरी **७)** लक्ष्मीनगर झोन कार्यालय **८)** एल.ए.डी कॉलेज **९)** नविन डी.पी रोड कृपलानी चौक ते अजनी रेल्वे पुल **१०)** मुकबधिर विद्यालय शंकर नगर चौक **११)** कार्पोरेशन एन.एम.सी. ग्राऊंड इंदीरा गांधी रूग्णालयाच्या मागे

सदरील अधिसुचना दिनांक १८.१०.२०२६ चे सकाळी ०९.०० ते दिनांक २१.१०.२०२६ चे २२.०० वा. पर्यंत अंमलात राहील.

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी व सर्व नागरिकांनी या आवाहनाचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

वाहतुक शाखेची प्रेस नोट– २

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा दिनांक २०.१०.२०२६ रोजी साजरा होणार असून, या प्रित्यर्थ देशाच्या विविध ठिकाणाहून दिक्षाभुमी येथे येणारे भाविक मंडळी कामठी येथील प्रसिध्द **ड्रॅगन पॅलेस** येथे भेट देत असतात. या ठिकाणी भाविकांची लाखोंच्या संख्येने उपस्थिती राहते. त्यामूळे त्याठिकाणी एका भव्य यात्रेचे स्वरूप निर्माण होते. सदर भाविकांची गर्दी दि. १९.१०.२०२६ ते दि. २२.१०. २०२६ या चार दिवसांकरीता असते. ड्रॅगन पॅलेस आणि आंबेडकर सांस्कृतीक भवन या धार्मीक स्थळी उपासक–उपासीकांची (भावीकांची) ये–जा असते. त्या मार्गावर मोठ्या संख्येने भावीक असतात आणि त्याच मार्गावरून ड्रॅगन पॅलेसचे पलीकडे राहणारे कुंभारे कॉलोनी, आझाद नगर, लुंबीनी नगर, छत्रपती नगर व आजुबाजुचे इतर भागातील रहीवासी हे वाहनाने (चारचाकी व दुचाकी) गर्दीतून बळजबरीने जाण्याचा प्रयत्न करतात. त्यामूळे जाणारे–येणारे वाहनांकडून उपासक–उपासीकांना (भावीकांना) अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. करीता अधिसूचना प्रसारित करण्यात आलेली आहे.

खालील प्रमाणे सर्व वाहनांना प्रतिबंध करण्यात येणारे मार्ग:–

पोरवाल कॉलेज रोड, वाय पॉईट ते भोयर कॉलेज टी–पॉईट या मार्गावरील सर्व प्रकारच्या वाहतूकीला प्रतिबंध करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :–

कुंभारे कॉलोनी, आझाद नगर, लुम्बीनी नगर, छत्रपती नगर या भागातील रहवासी व मार्गावरील इतर वाहतूक ही घोरपड टी पॉईन्ट, शासकिय आय.टी.आय. कॉलेज, रमानगर उड्डानपूलावरून जयस्तंभ चौकाकडे तसेच, जूना बोगदा पूलीया जे.एन रोडने नवीन भुयारी बोगदाकडून आजनी, गादा गावाकडून निरी पुलीया नंतर उजवे वळण घेवुन हैद्राबाद हायवे, लिहीगाव पूलीया खालून उजवे वळण घोरपड रोड, घोरपड टी पॉईट, उजवे वळण घेवुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, उजवे वळण घेवून छत्रपती नगर, रविदास नगर, कुंभारे कॉलोनी आझाद नगर या मार्गाचे वापर ये–जा करीता करतील. तसेच, ऐनवेळी निर्माण झालेल्या परिस्थितीनुसार व आवश्यकतेनुसार कर्तव्यावरील वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांना मार्ग बंद/सूरू ठेवण्याचा व योग्य मार्गाने वाहतूक वळविण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

सदरील अधिसुचना दिनांक १९.१०.२०२६ चे ०९.०० ते दिनांक २२.१०.२०२६ चे २२.०० वाजतापर्यंत अंमलात राहील.

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी व सर्व नागरिकांनी या आवाहनाचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

वाहतुक शाखेची प्रेस नोट– ३

मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्र. अपोमसं(वा)/४५/नियो/३१०५/२०१९ दिनांक २०.१०.२०१९ अन्वये पारीत केलेल्या अधिसुचेनेनुसार रस्ते अपघात आणि त्यामध्ये होणाऱ्या मृत्युमध्ये दरवर्षी १० टक्के घट करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याअर्थी नागपूर शहरातील अपघातांची कारणे पाहता सदरचे अपघात हे निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहने चालविल्यामूळे होत असून, त्यामध्ये निष्पाप लोकांचे नाहक बळी जात आहेत व अनेक लोक गंभीर जखमी होवून त्यांना कायमचे अपंगत्व येत आहे. त्यामुळे होणारे अपघातांवर आळा घालने अत्यंत आवश्यक असून, त्याकरीता शहरातील सुधारीत सिमेंन्ट रस्ते तसेच, ईन्नर व आऊटर रिंग रोड वरून चालणाऱ्या वाहनांसाठी वेग मर्यादा निश्चित करणे गरजेचे आहे. करीता खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे.

• यापुर्वी निर्गमीत झालेली अधिसुचना क्र. पोउपआ/वावि/अधि.वेग मर्यादा/१००४/२०१७ दिनांक ०९.०३.२०१७ प्रमाणे ठरविण्यात आलेली खालील वाहनांबाबतची वेग मर्यादा रद्द करण्यात येत असून शहरातील सध्याची लोकसंख्या, वाहनसंख्या तसेच, रस्ते व वाहतूकीची सद्यस्थिती पाहता, वाहनांवर खालील प्रमाणे वेग मर्यादेचे बंधन घालण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यातील वाहनांसाठी अनिर्वाय करण्यात आलेली वेग मर्यादा कि. मी./प्रतितास

अ. क्र.	वाहनांचा प्रकार	प्रवेश नियंत्रण असलेले द्रुतगती मार्ग		राष्ट्रीय/राज्य महामार्गावर ४ (२+२) अथवा जास्त मार्गिका असणारे विभाजीत (रस्त्याच्या मध्यभागी विभाजक असलेले मार्ग)		महानगर पालीका कार्यक्षेत्रामध्ये मधील द्रुतगती मार्ग आणि ६ (३+३) मार्गिका असणारे विभाजीत रस्ते		राष्ट्रीय/राज्य महामार्गावर २ अथवा जास्त मर्गिकेचे विभाजक नसलेले रस्ते व महानगर पालीका कार्यक्षेत्रा मधील ४ (२+२) मार्गिका असणारे विभाजीत रस्ते		नगरपालीका क्षेत्रातील रस्ते/इतर रस्ते	
		समतल भाग	घाट भाग	समतल भाग	घाट भाग	समतल भाग	घाट भाग (लागू असल्यास)	समतल भाग	घाट भाग	समतल भाग	घाट भाग
(१)	(२)	(३)		(४)		(५)		(६)		(७)	
	प्रवासी मोटार वाहने ज्यांचा उपयोग वाहन चालकांसह ८ प्रवासी यांचे वाहतूकी साठी केला जातो. (एम. १ श्रेणीतील वाहने)	१००	६०	९०	५०	८०	४०	७०	४०	६०	४०

	प्रवासी मोटार वाहने ज्यांचा उपयोग वाहन चालकांसह ९ किंवा त्यापेक्षा जास्त प्रवासी यांचे वाहतुकीसबंधी केला जातो. (एम २ आणि एम ३ श्रेणीतील वाहने)	८०	४०	८०	४०	६०	४०	६०	४०	५०	३०
	मोटार वाहने ज्यांचा उपयोग माल/सामान वाहतूकीसाठी केला जातो. (सर्व एन श्रेणीतील वाहने)	८०	४०	८०	४०	६०	४०	६०	४०	४०	३०
	दुचाकी मोटर वाहने	परवानगी नाही	परवानगी नाही	७०	४०	६०	४०	६०	४०	५०	४०
	चारचाकी मोटर रिक्षा	परवानगी नाही	परवानगी नाही	६०	४०	६०	४०	६०	४०	४०	३०
	तीनचाकी मोटर वाहने/रिक्षा	परवानगी नाही	परवानगी नाही	६०	४०	५०	४०	५०	४०	४०	३०

सदरील अधिसुचना दि. १७.१०.२०२६ पासून ते दि. १६.१२.२०२६ पर्यंत अंमलात राहील.

सदरहु अधिसूचना एक महिन्याच्या कालावधीसाठी पारीत करण्यात येत असून, त्याबाबत नमूद कालावधीत नागरीकांकडून जर काही हरकती व सुचना प्राप्त झाल्या तर त्याचा विचार करून पून्हा अधिसूचना काढताना केला जाईल.

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/–

(**आदित्य मिरखेलकर, भापोसे**)

पोलीस उप आयुक्त, वाहतुक,

नागपूर शहर